**वादीतर्फे साक्षीदार क्र ०१ ची उलटतपासणी.**
देवाची शपथ खरे सांगतो

**नाव:-**सुर्यकांत हरिभाउ ढगे.

<u>उर्वरित उलटतपास प्रतिवादी यांच्यातर्फे श्री जी.आर.हुंगे यांच्यामार्फत शपथेवर सुरू</u>

**प्रश्न-** शपथपत्रामधील परिच्छेद क्र. १८ प्रमाणे तुम्हाला शेती काय म्हणुन दिली होती.
**उत्तर-** मी घरातील मोठा होतो, मला शेतीचा अनुभव होता म्हणुन मला शेती दिली होती. सदर शेती मला दिल्याबाबत लिखापडी झाली होती. शेती मला दिल्याचा लेख लिहीला होता. सदर लेख माझे आई-वडील व माझे वहीण-भाऊ यांच्यासमोर लिहून दिला होता सर्वांच्या स्वक्षरीसहीत दिला होता. सदर लेख १९७६ मध्ये लिहून दिला होता. सदर लेख मला एका कागदावर लिहून दिला होता स्टँप पेपरवर लिहून दिला नव्हता. सदर लेखामध्ये मी घरातील मोठा भाऊ असल्याने मी प्रकाश याचे शिक्षण पुर्ण करावे असे लिहीलेले होते. सदर लेख नोंदनिकृत केला नव्हता. सदर लेख मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, प्रकाशकडे आहे. सदर लेख प्रकाश यांच्याकडे असल्याबाबत मी सदर लेख दाखल करण्याकामी त्यांना नोटीस दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर लेख तयारच केलेला नाही तसेच तो लेख प्रकाश यांचेकडे नाही त्यामुळे सदर लेख दाखल करण्याकामी मी नोटीस त्यांना दिलेले नाही. मी वाद शेतीचा मालक प्रतिवादी प्रकाश यांच्याकडे असलेलया लेखाप्रमाणे आहे.

हे म्हणणे खरे नाही की, वाद शेतीवर प्रतिवादी प्रकाश यांनी कर्ज घेतले होते. माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.१८ पान नं.०७ मधील मजकूर बँकेचे कर्ज प्रतिवादी क्र. ०१ याने घेतले होते व ते कर्ज बँकेला परतफेड केले नाही हा अधोरेखांकित भाग अ मला वाचुन दाखविण्यात आला तो चुकीचा लिहीलेला आहे. **यावर प्रतिवादी यांचे वकील श्री.एस.डब्लू.तिजारे यांनी हरकत घेउन सांगितले की, मृत्यूपत्रातील मजकूर हा आव्हानित केलेला आहे व त्याबाबतचा मजकूर हा पुराव्याच्या शपथपत्रामध्ये घेतलेला आहे त्यामुळे**

**वरिल बाब शपथपत्रामध्ये आलेली आहे व सदर मृत्युपत्र हे आव्हानितच केलेले नाही असे गृहीत धरून वरिल प्रश्न विचारला गेलेला आहे. यावर वादी यांच्या वकीलांनी सांगितले की, शपथपत्रातील मजकुराबाबतच मी प्रश्न विचारलेला आहे व पुर्णविरामानंतर ते पुर्णविरामापर्यंत सदर अधोरेखांकित भाग अ बाबत प्रश्न विचारलेला आहे.** सदर हरकत व त्यावरील युक्तीवाद हा अंतिम युक्तीवादासाठी खुला ठेवण्यात येत आहे.

हे म्हणणे खरे नाही की, दि.०६/१०/२००८ ला हरिभाउ यांनी जे मृत्युपत्र करून दिले होते त्यावेळेस हरिभाउ यांची प्रकृती चांगली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६/१०/२००८ ला हरिभाउ हे स्वत: नोंदणी कार्यालयात आले होते. दि.०६/१०/२००८ ला हरिभाउ यांना अशक्तपणा आला होता व ताप होता. मीच हरिभाउ यांना गोळ्या आणुन दिल्या होत्या. सदरहु गोळ्या डॉक्टरांनी दिल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. ४३ वरिल स्टॅंप हा हरिभाउ ढगे यांच्या नावाने आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मला वकीलसाहेबांनी प्रश्न पूर्णपणे विचारला नाही आणि पुढे सांगतात की, सदर स्टॅंप वडीलांच्या नावाने आहे परंतु वडीलांनी विकत घेतलेला नाही. सदर स्टॅंप हरिभाउ ढगे यांनी विकत घेतलेला नाही करण त्याच्यावर प्रकाश ढगे किंवा त्याच्या मुलाची सही असु शकते. सदर साक्षीदार सांगतो की, मी सदर स्टॅंप अभिलेखावर दाखल करू शकतो व पुन्हा सांगतो की, सदर स्टॅंप अभिलेखावर दाखल केला आहे व तोच मला आता दाखविण्यात आला होता. सदर साक्षीदारांना प्रतिवादीच्या वकीलांनी सदर स्टॅपपेपर दाखविला असता सदर साक्षीदार सांगतो की, माझा चष्मा घरी राहीला आहे माझा चष्मा आणल्यावर मी वाचतो. सदर साक्षीदार सांगतो की मी आज सदर स्टॅंप चष्म्याशिवाय वाचु शकत नाही त्यामुळे उलटतपास तहकूब करावा. सदर साक्षीदाराने पुढील तारखेपर्यंत उलटतपास तहकूब करण्याची विनंती केली सबब उलटतपास तहकूब.

**उलटतपास तहकूब करण्यात आला.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०७.०१.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड

**<u>उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यातर्फे श्री जी.आर.हुंगे यांच्यामार्फत शपथेवर सुरू</u>**

हे म्हणणे खरे आहे की नि. क्र ४३ हा हरीभाउ आप्पाजी ढगे यांच्या नावाने आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की सदर नि. क्र.४३ त्यांनी घेतलाच नव्हता. नि.क्र. ४३ हा हरीभाउ ढगे यांच्या नावाने नव्हता मी याच्या आधारे सांगतो की त्यावेळी स्टॅम्प खरेदी केल्याचे रजीस्टर बघीतले असता त्यावर हरीभाउ आप्पाजी ढगे यांचे नाव नव्हते. स्टॅम्प ज्यांनी खरेदी केला म्हणुन हरीभाउ आप्पाजी ढगे यांचे नाव स्टॅम्प वेंडरच्या लीस्ट वर नाही. नि. क्र ६९ वरील दस्तावेज मीच दाखल केला आहे. आता मला नि. क्र ४३ दाखविण्यात आला त्यावरील स्टॅम्प अनुक्रमांक हा १५३९८ असा आहे. आता मला नि. ६९ दाखवला त्यामध्ये स्टम्प पेपर घेणार म्हणुन हरीभाउ आप्पाजी ढगे असे लिहीलेले आहे. आता मला नि. ४३ दाखविण्यात आला त्यावर ९४७३७२ असा स्टॅम्प नंबर आहे व तोच स्टॅम्प नं. नि. क्र. ६९ वर नमुद आहे.

हे म्हणणे खरे आहे की नि. क्र. ४३ वर हरीभाउ आप्पाजी ढगे यांची प्रत्येक पानावर सही आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की त्यावरील सहया खोटया आहेत.

प्रश्न : तुम्ही कशाच्या आधारे सांगता की नि. क्र ४३ वर हरीभाउ आप्पाजी ढगे यांची सही नाही ?

उत्तर : ते अशी सही करीत नव्हते.

हरीभाउ आप्पाजी ढगे हे कशी सही करायचे ते मी सांगु शकत नाही. नि. क्र. ४३ मीच दाखल केले आहे. हे म्णणे खरे नाही की नि. क्र. ४३ वर माझ्या वडीलांचा फोटो सीस्टीम मध्ये घेतलेला आहे. हे मला माहित नाही की दुयम निबंधक कार्यालयात गेल्यानंतर दस्तावेज तयार करतांना सीस्टीम मधील कॅमे-यामध्ये फोटो घेतात किंवा कसे.

प्रश्न : तुम्ही काही मिळकती विकत घेतल्या आहेत काय किंवा तुम्ही मिळकती विकत घेतांना साक्षीदार होते काय ?

उत्तर : नाही.

हरीभाउ आप्पाजी ढगे यांचा जुना फोटो माझ्याकडे नाही. नि. क्र. ४३ वरील फोटो माझ्या वडीलांचा नाही कारण मला माझ्या वडीलांचा फोटो कसा आहे हे माहित आहे. नि. क्र ४३

वर माझ्या वडीलांचा फोटो नसल्याबाबत मी पो. स्टे. ला तक्रार केली नव्हती.

प्रश्न : हरीभाउने किती मृत्युपत्र तयार केले ?

उत्तर : एकही नाही.

नि. क्र. ४३ मध्ये अर्धा भाग मला व अर्धा भाग प्रकाश याला रानमांगली येथील शेतीबददल दिल्याचे नमुद आहे.

हे म्हणणे खरे नाही की हरीभाउ आप्पाजी ढगे यांनी दि. १७.१२.२००९ रोजी दुसरे मृत्युपत्र लिहीले होते. हे म्हणणे खरे आहे की दि. १७.१२.२००९ रोजीचे मृत्युपत्र नि. क्र. ४५ वर दाखल केलेले आहे. नि. क्र ४५ मध्ये हरीभाउ आप्पाजी ढगे यांचे नावाचे स्टॅम्प पेपर आहे. हे म्हणणे खरे नाही की नि. क्र. ४५ वरील स्टॅम्प खरेदी केल्याबाबत हरीभाउ आप्पाजी ढगे यांची सही आहे. हे म्हणणे खरे नाही की नि. क्र ४५ मध्ये पुर्ण पाने लावलेली नाहीत. आता मला नि. क्र ४५ दाखविण्यात आला त्यावरील समोरील पानावर एकुण १३ पृष्टे असे लिहीलेले आहे. मी आता नि. क्र ४५ चे पाने मोजली असता त्याचे एकुण पाने १३ आहेत. सदर साक्षीदाराला नि. क्र ४५ वरील पानांची मोजणी करून दाखविली असता त्यामध्ये चौथ्या पानानंतर सरळ अकरा क्रमांकाचे पान आहे व त्यानंतर आरा क्रमांकाचे पान आहे व त्यानंतर तेरा क्रमांकाचे पान आहे. हे म्हणणे खरे आहे की नि. क्र ४५ मधील पान क्र १३ वर दुयम निबंधक यांची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की नि. क्र. ४५ मधील पान क्र. ४ नंतर सहा पाने नाहीत व सरळ ११ क्रमांकाचे पान सुरू होते.

प्रश्न : तुम्ही नि. क्र. ४५ चे पुर्ण पाने असलेले दस्तावेज दाखल करू शकता काय ?

उत्तर : होय.

साक्षीदार स्वत:हुन सांगतो की मी सदर दस्तावेज मी अभिलेखावर दाखल करू शकतो त्यामुळे मला वेळ देण्यात यावा.

**सदर साक्षीदाराला न्यायाच्या दृष्टीने सदर दस्तावेज दाखल करण्याकामी वेळ दयावा अशी विनंती केल्याने उलटतपास तहकुब**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ३१.०७.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड